# सामाजिक न्याय विभागाच्या योजना व शिक्षणामुळे युवकांचा व्यक्तिमत्व विकास

**डॉ. रवींद्र सहारे**
सहयोगी प्राध्यापक,
अनिकेत कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.
Email :-saharerravi4@gmail. com
Mob No :9049669043

**सारांश :**

प्रस्तुत अध्ययन सामाजिक न्याय विभागाच्या योजना व शिक्षणामुळे युवकांचा व्यक्तिमत्व विकास यावर आधारित असल्यामुळे युवकांचे कल्याण साधणे आणि त्यांना शिक्षण व प्रशिक्षण हा उद्देश आहे. सामाजिक न्याय विभागाच्या योजना गरजूपर्यंत पोहोचविण्यासाठी समाजकार्याच्या व्यावसायिक ज्ञानाची गरज महत्त्वाची असते. यामुळे दुर्बल घटकांचे कल्याण योग्य रितीने साधता येऊ शकते. हयावरून सामाजिक न्याय योजनेच्या अंमलबजावणी करीता व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण व प्रशिक्षण हया दोन्हीचा संबंध हा प्रस्तुत अध्ययनात आला आहे. विशेष काळजी घेऊन शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देईल लोकांचा दुर्बल घटक, आणि विशेष:, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, आणि त्यांचे सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारांपासून संरक्षण करेल.तसेच युवकांना व्यक्तिमत्व विकासात येणाऱ्या अडचणी जाणून घेणे, योजने विषयी लाभार्थ्यांचा दृष्टीकोन जाणून घेणे, प्रशासनाच्या योजना राबविण्याचा दृष्टीकोन जाणून घेणे व हयातून जे निष्कर्ष निघतील ते नंतर संशोधन करणाऱ्याला उपयोगी पडण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे शासनाला व योजना राबविणाऱ्या जिल्हा स्तरिय यंत्रणेला योजना राबविण्यास मदत मिळेल.

**कि वर्ईस** : सामाजिक न्याय विभाग, योजना, शिक्षण, युवक, व्यक्तिमत्व विकास

**प्रस्तावना :—**

**ग्रामीण भागातील शैक्षणिक परिस्थिती**

बऱ्याच वेळा आपण घरातील वडीलधाऱ्या माणसांकडून ऐकतो, 'आमच्या वेळी आम्ही दहा दहा मैल चालत अंतर कापून शाळेत जायचो. पोरांनो, तुम्ही फारच नशीबवान आहात. आज तुम्हाला सगळया शैक्षणिक सुखसोयी उपलब्ध आहेत आणि आज तुम्ही पाहिजे त्या क्षेत्रात उच्चशिक्षण घेऊ शकता. शिक्षणाची आताची परिस्थिती आमच्या वेळेच्या शिक्षणाच्या मानाने फारच बदलली आहे.' यातील काही गोष्टी खऱ्या असल्या तरी आजही महाराष्ट्रात असे कितीतरी ग्रामीण विभाग आहेत, जिथे शाळेची अद्याप सोय नाही.

महाराष्ट्रात जन्मणाऱ्या, इथे लहानाचे मोठे होणाऱ्या प्रत्येक मुलाचे आयुष्य आपण घडवत आहोत, घडवणार आहोत याची खात्री आज आपण देऊ शकत नाही. त्यांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी लागणारी सामग्री आपली शिक्षण व्यवस्था आपल्या मुलांना आज पुरवते आहे का या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल.

आपले शैक्षणिक धोरण उत्तम आहे. बालकांचा शिक्षणाचा मूलभूत हक्क आपण मान्य केला आहे, अत्यंत समग्र आणि सर्वसमावेशक असा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला आहे. राष्ट्रीय एकात्मता राखण्यासाठी काही बाबी समान ठेवून स्थानिक गरजेनुसार या आराखडयात बदल करण्याचे अधिकार राज्यांना दिले आहेत. २१ व्या शतकातला नागरिक बनवण्याची ताकत असलेली रचनात्मक शैक्षणिक पध्दती स्वीकारली आहे. शिक्षण केवळ पुस्तकी न राहता वर्गाबाहेरील घडामोडींचा समावेश कसा होईल, विद्यार्थ्यांच्या भविष्यातील जीवनात ते प्रत्यक्ष उपयोगी कसे पडेल, विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडवले जाईल यादृष्टीने त्याचे अनुभव विश्व कसे समृध्द करता येईल या सर्वांचा विचार त्यात केला आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार राज्यातले सुमारे ५५ टक्के लोक २९ वर्षाच्या खालचे आहेत, आणि सुमारे २८ टक्के लोकसंख्या १५ ते २९ या वयोगटातच मोडते. ही तरूण पिढी आज नोकरी—व्यवसायाच्या शोधात आहे. मात्र या तरूणांकडे आपल्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्ये वा शिक्षणच पुरेसे नाही. केवळ पोटा—पाण्यापुरते पैसे कसे कमवावेत हिच विवंचना अधिक आहे. गरिबीचे प्रमाण अशिक्षितांपेक्षा अधिक आहे.

मागासवर्गीय आणि आदिवासींमध्ये तर ही समस्या अधिकच गंभीर आहे.
सर्वसाधारणपणे बेरोजगारीचे प्रमाण शिक्षितांमध्ये कमी असते. अशिक्षितांना कुठले ना कुठले स्वरूपाचे काम करावेच लागते,

शिक्षणामुळे आपल्या पायावर उभे राहता यावे या पहिल्या उद्‌दिष्टातच आपण नापास आहोत. आज १५ ते २९ वयोगटात मोडणाऱ्या २८ टक्के तरूणांना त्याच्या पायावर उभे होण्याइतपत शिक्षण देण्यात आपण अयशस्वी ठरलो आहोत. आणि यात आपण काही बदल केला नाही तर आज १५ वर्षाखाली असलेल्या सुमारे २७ टक्के मुलांचे भवितव्यही कदाचित हेच असेल.

**समाजकल्याण विभाग :—**

मागासवर्गीयांचे सामाजिक व शैक्षणिक जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांच्या उन्नतीसाठी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेषसहाय विभाग तसेच जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागा मार्फत वेगवेगळया योजना व उपक्रम राबविण्यात येत आहे.

**योजना राबविण्यामागील उद्यिष्टये:—**

मागासवर्गीय मुला—मुलींची शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे त्याचप्रमाणे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहेत.

**सामाजिक न्याय विभागाच्या योजना**

१) अनु.जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना.
२) मागासवर्गीयांच्या सहकारी गृह निर्माण संस्थांना अर्थसाहय्य.
३) इंदिरा आवास योजना.
४) दलित वस्ती सुधार योजना.
५) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना.
६) अनु.जाती/नवबौध्द शेतकऱ्यांना कृषी विकासासाठी अर्थसहाय्य योजना.
७) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास योजना.
८) अनु.जाती व नवबोध्द अल्पभूधारक शेतकऱ्यांना यावर टिमरचा पुरवठा.

९) अनु.जाती व नवबौध्दांना घरगुती विद्युत जोडणी.
१०) डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, पीक उत्पादन प्रोत्साहन योजना.
११) अनुसुचीत जाती व नवबौध्द उमेदवारांना मोटार वाहन चालक प्रशिक्षण देणे.
१२) अनुसुचीत जाती व नवबौध्द उमेदवारांना मोटार वाहन चालक प्रशिक्षण देणे.
१३) जिल्हा उधोग केंद्र कर्ज योजना.
१५) उद्योजकता विकास प्रशिक्षण योजना.
१६) युवक कल्याण क्षेत्रात कार्यकरणाऱ्या स्वयंसेवी युवक मंडळ संस्थांना आर्थिक सहाय्य देण्याची योजना व समाजसेवा शिबिराचे आयोजन.
१७) कन्यादान योजना.
१८) आंतरजातीय विवाहित दाम्पत्यांना प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य.
१९) अनुसूचित जातीसाठी प्रसिध्दी कक्ष.
२०) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना.
२१) परदेशात शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना.
२२) देशातील शैक्षणिक संस्थामध्ये उच्च शिक्षणासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना.
२३) विशेष प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना.
२४) व्यावसायीक प्रशिक्षण योजना.
२५) इयत्ता १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांना गणवेश व लेखन साहित्य पुरविणे.
२६) दुर्बल घटकातील मुलींना उपस्थिती भत्ता.
२७) माध्यमिक शाळेतील शिष्यवृत्ती योजना.
२८) वर्ग ५वी ते १०वीतील विद्यार्थ्यानींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.
२९) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण/परीक्षा फी देणे.
३०) अस्वच्छ काम करणाऱ्या पालकाच्या मुलांना मॅट्रीक पुर्व शिष्यवृत्ती.
३१) भारत सरकारची मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना.
३२) वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन.
३३) वैद्यकीय, अभियांत्रीकी, कृषी, पशु—वैद्यकीय विद्यार्थ्याकरीता पुस्तक पेढया.
३४) सैनिकी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.
३५) अस्वच्छ काम करणाऱ्या सफाई कामगारांच्या कुटुंबियांना प्रशिक्षण व पुनर्वसनयोजना.
३६) अस्पृश्यता निर्मूलनार्थ उत्कृष्ट काम करणाऱ्या खेडयांना पारितोषिक.
३७) डॉ.आंबेडकर दलित मित्र पुरस्कार सन्मान.
३८) शाहू,फुले, आंबेडकर पुरस्कार योजना.
३९) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार योजना.
४०) अनु.जाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमा अंतर्गत पुर्नवसनासाठी अर्थसहाय्य.

४१) विविध महामंडळा मार्फत राबविण्यात येणाऱ्या ठळक योजना.
४२) राष्ट्रीय अनु.जाती वित्त विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना.
४३) एन.एस.एफ.डी.ली. नवी दिल्ली यांच्या योजना.
४४) अपंग कल्याण योजना.
४५) तांडा सुधार योजना.

वरिलप्रमाणे योजना सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीच्या उन्नतीसाठी राबविल्या जातात. यात प्रामुख्याने अनुसुचित जातीच्या शैक्षणिक उन्नतीसाठी अनेक योजना निर्माण केलेल्या आपल्याला दिसून येतात. ज्यात प्रामुख्याने शिष्यवृत्ती योजना, विद्यावेतन योजना, उपस्थीती भत्ता योजना, गणवेश वाटप व लेखन साहीत्य पूरविणे इ. सारख्या अनेक योजनांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती /एसबीसी /व्हीजेएनटी मुलींसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले हयांच्या नावाने शिष्यवृत्तीयोजना सुरू करून विद्यार्थीनी कोणत्याही आर्थिक अडचणीशिवाय या योजनेंतर्गत आपले शिक्षण पूर्ण करू शकतात.

**सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाची कार्यप्रणाली :—**

सामाजिक न्याय आणि सशक्तीकरण मंत्रालयाचे उद्दिष्ट एक सर्वसमावेशक समाजाची स्थापना करणे आहे. ज्यामध्ये लक्ष्य गटातील सदस्य त्यांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी योग्य समर्थन मिळवून स्वत:साठी उत्पादक, सुरक्षित आणि सन्माननीय जीवन जगू शकतील. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकास आणि आवश्यक तेथे पुनर्वसन कार्यक्रमांद्वारे लक्ष्यित गटांना पाठिंबा देणे आणि त्यांना सक्षम करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभागाला,

१) अनुसूचित जाती
२) इतर मागासवर्गीय
३) ज्येष्ठ नागरिक
४) दारू आणि अंमली पदार्थांचे सेवन
५) यासह समाजातील सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्टया उपेक्षित घटकांचे सक्षमीकरण करणे अनिवार्य आहे.
६) भिकारी
७) विमुक्त आणि भटक्या जमाती आणि
८) आर्थिकदृष्टया मागास वर्ग

विभाग आपल्या कार्यक्रम आणि योजनांद्वारे सर्वसमावेशक समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करतो ज्या अंतर्गत लक्ष्य गटांच्या सदस्यांना त्यांच्या वाढीसाठी आणि विकासासाठी पुरेसे पाठिंबा दिला जातो.

**धोरणे आणि कार्यक्रमांची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत :—**

१) अनुसूचित जाती, इतर मागास वर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग आणि विमुक्त आणि भटक्या जमाती यांचे शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण.
२) ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या देखभाल, कल्याण, सुरक्षितता, आरोग्य, उत्पादन आणि स्वतंत्र जीवन जगण्यात मदत करणे आणि त्यांचे समर्थन करणे.

३) अल्कोहोल आणि मादक पदार्थांचे सेवन पीडितांना प्रतिबंध आणि उपचार.

**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना**

भारत हा कल्याणकारी देश आहे. देशामध्ये राबविण्यात येणारे कार्यक्रम आणि धोरणे यांचा मुख्य उद्देश व्यक्तींच्या विकासासाठी आणि कल्याणकडे नेणे हा आहे, विशेषतः वंचित आणि उपेक्षित समुदायांवर लक्ष केंद्रीत करणे. प्रस्तावना, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत अधिकार आणि विशिष्ट कलमे, म्हणजे, भारतीय राज्यघटनेतील कलम ३८, ३९ आणि ४६, राज्याच्या लोकांप्रती असलेल्या वचनबध्दतेची साक्ष देतात. अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) या सामाजिकदृष्ट्या वंचित गटांनी त्यांच्या समुदायावर आणि आर्थिक प्रगतीवर कालांतराने विशेष भर दिला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसींचा जलद सामाजिक—आर्थिक विकास सुनिश्चित करण्यासाठी योग्य पर्यावरणीय परिस्थिती निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध कल्याणकारी कार्यक्रमांची रचना आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली योग्य धोरणे तयार करण्यासाठी विविध कल्याणकारी कार्यक्रमांची रचना आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली योग्य धोरणे तयार करण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. या समुदायांच्या कल्याणासाठी, निधी राखून, सबसिडीची तरतूद करून, रोजगाराच्या संधींमध्ये आरक्षणे, शैक्षणिक संस्था आणि इतर प्रशिक्षण केंद्रे (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण) याद्वारे वेगळे लक्ष्यउन्मुख कार्यक्रम राबवले जात आहेत.

**सामाजिक न्याय विभागाच्या योजना व शिक्षणामुळे युवकांचा व्यक्तिमत्व विकास :—**

प्रस्तुत अध्ययन हे सामाजिक न्याय विभागाच्या योजना व शिक्षणामुळे युवकांचा व्यक्तिमत्व विकास यावर आधारित असल्यामुळे युवकांचे कल्याण साधणे आणि त्यांना शिक्षण व प्रशिक्षण हा उद्देश आहे. सामाजिक न्याय विभागाच्या योजना गरजूपर्यंत पोहोचविण्यासाठी समाजकार्याच्या व्यावसायिक ज्ञानाची गरज महत्त्वाची असते. यामुळे दुर्बल घटकांचे कल्याण योग्य रितीने साधता येऊ शकते. हयावरून सामाजिक न्याय योजनेच्या अंमलबजावणी करीता व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण व प्रशिक्षण हया दोन्हीचा संबंध हा प्रस्तुत अध्ययनात आला आहे.

विशेष काळजी घेऊन शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देईल लोकांचा दुर्बल घटक, आणि विशेषः, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, आणि त्यांचे सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारांपासून संरक्षण करेल.

तसेच युवकांना व्यक्तिमत्व विकासात येणाऱ्या अडचणी जाणून घेणे, योजने विषयी लाभार्थ्यांचा दृष्टीकोन जाणून घेणे, प्रशासनाच्या योजना राबविण्याचा दृष्टीकोन जाणून घेणे व हयातून जे निष्कर्ष निघतील ते नंतर संशोधन करणाऱ्याला उपयोगी पडण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे शासनाला व योजना राबविणाऱ्या जिल्हा स्तरिय यंत्रणेला योजना राबविण्यास मदत मिळेल.

**संशोधन विषय :—**

**सामाजिक न्याय विभागाच्या योजना व शिक्षणामुळे युवकांचा व्यक्तिमत्व विकास :—**

**संशोधनाचे उददेश :**

१) सामाजिक न्याय विभागाच्या योजनांमुळे युवकांच्या शैक्षणिक विकासामध्ये योगदाना विषयीचा अभ्यास करणे

२) शिक्षणामुळे युवकांचा व्यक्तिमत्व विकासामध्ये योगदानाविषयी महाविद्यालयीन युवकांचे मत अभ्यासणे

**संशोधन आराखडा वनमुना निवड पध्दती :—**

प्रस्तुत संशोधन करतांना वर्णणात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आलेला असून नमुना आकार निवडतांना गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील सहेतूक नमुना या पध्दतीचा वापर करून वर्धा शहरातील ९० महाविद्यालयीन युवकांचे मत अभ्यासण्यात आलेले आहे.

**निष्कर्ष :—**

- बहुतांश उत्तरदात्यांनी शैक्षणिक योजनेचा लाभ घेतला असून त्यापैकी बऱ्याच उत्तरदात्यांना सामाजिक दर्जा उंचावण्यास पुर्णत: मदत झाली आहे. तर काही उत्तरदात्यांना सामाजिक दर्जा उंचावण्यास अंशत: मदत झाली असल्याचे आढळून आलेले आहे.
- बहुतांश उत्तरदात्यांना सामाजिक न्याय विभागाच्या योजनेमुळे शैक्षणिक दर्जा उंचावण्यास अंशत: मदत होत असून त्यापैकी बरेच उत्तरदाते विकासात्मक परिवर्तनाबाबत पुर्णत: समाधानी आहे. तर काही उत्तरदाते अंशत: समाधानी असल्याचे आढळून आलेले आहे.
- बहुतांश उत्तरदात्यांच्या शैक्षणिक दर्जामुळे आर्थिक दर्जात अंशत: वाढ होत असून त्यापैकी बरेच उत्तरदाते विकासात्मक परिवर्तनाबाबत पुर्णत: समाधानी आहे. तर काही उत्तरदाते अंशत: समाधानी असल्याचे आढळून आलेले आहे.
- बहुतांश उत्तरदाते व्यक्तिमत्व विकासाबाबत अंशत: समाधानी असून त्यापैकी बरेच उत्तरदाते विकासात्मक परिवर्तनाबाबत पुर्णत: समाधानी आहे. तर काही उत्तरदाते अंशत: समाधानी असल्याचे आढळून आलेले आहे.
- बहुतांश उत्तरदाते केंद्र शासनाच्या योजनांबाबत अंशत: समाधानी असून त्यापैकी बरेच उत्तरदाते विकासात्मक परिवर्तनाबाबत पुर्णत: समाधानी आहे. तर काही उत्तरदाते अंशत: समाधानी असल्याचे आढळून आलेले आहे.

**संदर्भ :—**

भांडारकर पु. ल.,(१९७६, १९८०), सामाजिक संशोधन पध्दती, विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,

गुप्ता एम. एल.,(२००५),डॉ. शर्मा भारतीय ग्रामिण समाजशास्त्र, साहित्य भवन, पब्लिकेशन, दिल्ली

घाटोळे, रा. ना., (२००८—०९), ‘‘समाजशास्त्रीय संशोधन पद्धती,’’ मंगेश प्रकाशन, नागपूर

Choudhary, D.Pal (1993): “Hand book of Social Welfare”(Delhi : Atmaram and Sons Publication,

गायकवाड, प्रदिप, (२००४)‘‘समाज कल्याण’’ (नागपूर: क्षितीज पब्लिकेशन

गिरी, कुसुम, (१९९७)‘‘शिक्षा का समाजशास्त्र’’ (जयपूर : रावत पब्लिकेशन

कोत्तापल्ले,लक्ष्मण (२००९),‘‘भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन’’
(औरंगाबाद: विद्या बुक्स् पब्लिशर्स

लवानिया, एम.एम., जैन, शशि के, ‘‘भारतीय सामाजीक व्यवस्था’’ (जयपूर : रिसर्च पब्लिकेशन)

कऱ्हाडे, बी. एम, (२००६),‘‘ शास्त्रीय संशोधन पद्धती’’, पिपंळापूरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, नागपूर
खडसे, भा. वि. (१९९९), भारतातील सामाजिक समस्या, मंगेश प्रकाशन, नागपूर
Merton, Robert K. "Social Theory and Social Structure" (New York : the free Press, 1968)
मोहन हिराबाई हिरालाल, (२००२)आपण आपला मार्ग शोधूया, शाम ब्रदर्स नागपूर
निंबाळकर, स. के. (२००५), समाजकल्याण, केशव — कृष्णा चंदपूर
स्टुअर्ट चैस., गुरूनाथ नालगोंडे, (१९८६), सामाजिक संशोधन पद्धती, कोल्हापूर, फडके प्रकाशन
वाजपेयी एस आर., सामाजिक अनुसंधान तथा सर्वेक्षण, किताब घर,कानपूर—३, पान. न. २२१
नाटानी, पी.एन,‘(२०००) ‘भारतमे सामाजीक समस्याएॅं’’,शर्मा, प्रज्ञा (जयपूर : पोइन्टर पब्लिशर्स,